नि.फौ.ख.क्र.५४७/२०२१
नि.२९

**अभियोगपक्षातर्फे साक्षीदार क्र.१ चा शपथपूर्वक जबाब**
**मी शपथेवर सत्य कथन करतो की,**

**माझे नाव – नानासाहेब रेवजी शेळके,**
**वय –** ६३ वर्षे, व्यवसाय– शेती,
**राहणार –** आडगांव खुर्द, ता.राहाता, जि.अहमदनगर.

---

**सरतपास– अभियोगपक्षातर्फे श्री. जी.व्ही. बोर्डे,विद्वान विशेष सहायक सरकारी अभियोक्ता यांच्यातर्फे**

दिनांक १७/०६/२०२१ रोजी काय घटना घडली ते मला आठवत नाही. त्यादिवशी माझ्यात व आरोपींमध्ये किरकोळ वाद झाले होते. त्यादिवशी गर्दी जमली जमली होती व कोणी कोणास मारहाण केली ते मला सांगता येणार नाही. त्यादिवशी कोणत्या हत्याराने मारहाण झाली होती ते मला सांगता येणार नाही. मी, बाळासाहेब व पंकज यांनी दवाखान्यात उपचार घेतले होते. आता मला फिर्याद दाखविली. त्यावर माझी सही आहे. त्यातील मजकूर मला सांगता येणार नाही. त्यास सही पुरता **निशाणी क्र.३०** देण्यात आला.

**(साक्षीदार अभियोग पक्षास सहकार्य करत नसल्यामुळे सरकारी अभियोक्ता यांनी साक्षीदारास उत्तर सुचक सुचन देण्याची परवानगी मागितली. परवानगी मंजुर करणेत आली.)**

२. सर्व आरोपी माझे जवळचे नातेवाईक आहेत. हे मला आठवत नाही की, घटनेच्या दिवशी आरोपींनी रस्त्यावर मुरूम टाकण्याच्या कारणावरून मला, बाळासाहेब व पंकज यास लोखंडी गज व काठ्यांनी मारहाण करून जखमी केले. हे म्हणणे खरे नाही की, त्यावेळी आरोपी दादासाहेब शेळके याने मला धरून ठेवले होते व आरोपी संकेत याने मला लोखंडी गजाने डोक्यात मारहाण केली होती. हे म्हणणे खरे नाही की, त्यावेळी आरोपी प्रविण व आरोपी रामनाथ यांनी माझा भाऊ बाळासाहेब यास लाकडी काठयानी मारहाण केली. हे म्हणणे खरे नाही की, त्यावेळी माझा मुलगा पंकज सोडवायला आला असता, आरोपींनी त्याला देखील लाकडी काठ्यांनी व गजानी मारहाण केली. हे मला आठवत नाही की, त्या घटनेसंबंधाने मी पोलीस स्टेशनला फिर्याद दाखल केली होती. गट क्र.२५

मधून गट क्र.५१९ पर्यंत मुरूम टाकून रस्ता पूर्ण झाला आहे. हे म्हणणे खरे आहे की, त्यामुळे माझ्यात व आरोपींमधील वाद न्यायालयाबाहेर आपसात मिटले आहेत. हे म्हणणे खरे नाही की, आरोपी हे माझे भाऊबंध असल्यामुळे व आमची न्यायालयाबाहेर आपसी तडजोड झाल्यामुळे मी आज रोजी खोटी साक्ष देत आहे.

**सरतपास पुर्ण.**

**<u>उलटतपास – आरोपीतर्फे विद्वान विधिज्ञ श्री.एस.एन.कोते यांनी नाकारला.</u>**

**फेरतपास काही नाही.**

**साक्षीदार मुक्त.**

दिनांक – १७/०३/२०२६

| | |
|---|---|
| माझे समक्ष | श्रवणोत्तर स्वीकृती |
| PRASAD SHANKARRAO GIRGAONKAR<br>Digitally signed by PRASAD SHANKARRAO GIRGAONKAR<br>Date: 2026.03.17 16:20:20 +0530 | PRASAD SHANKARRAO GIRGAONKAR<br>Digitally signed by PRASAD SHANKARRAO GIRGAONKAR<br>Date: 2026.03.17 16:20:04 +0530 |
| (प्र. शं. गिरगांवकर) | (प्र. शं. गिरगांवकर) |
| प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, | प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, |
| (न्यायालय क्र. ३), राहाता. | (न्यायालय क्र. ३), राहाता. |